**प्रेस नोट** दिनांक : ३१/०१/२०२४

**सह दुय्यम निबंधक वर्ग २, कल्याण ५ येथील सह दुय्यम निबंधकास लाचेची रक्कम स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे पथकाने ताब्यात घेतले.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/ घटक | ठाणे |
| पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्रमांक | कोळशेवाडी पोलीस स्टेशन, कल्याण. |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | राज बापू कोळी, वय ५३ वर्षे, सह दुय्यम निबंधक, (वर्ग २), सह दुय्यम निबंधक वर्ग २, कल्याण ५, कल्याण. |
| आरोपी खाजगी इसम | सुभाष बाळू ठाकरे, वय ८६ वर्षे, खाजगी इसम |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | १२,०००/- रूपये |
| स्विकारलेल्या लाचेची रक्कम | १२,०००/- रूपये |

थोडक्यात हकिकत :-

यातील तक्रारदार व त्यांची पत्नी यांच्या नावे सदनिका खरेदी केली असून त्याचा करारनामा केलेला आहे. सदर दोन्ही सदनिका खरेदीच्या व्यवहाराची दस्त नोंदणी होण्याकरीता मुद्रांक व नोंदणी शुल्काची रक्कम तक्रारदार यांनी चलनाद्वारे भरणा केलेली आहे. सदर दस्त नोंदणी करीता निबंधक कार्यालय, कल्याण नं. ५ येथे सह दुय्यम निबंधक श्री. कोळी यांनी प्रत्येक सदनिकेकरीता रूपये रु. १५,०००/- या प्रमाणे एकूण ३०,००० रू. लाचेची मागणी केली.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि.२८/०१/२०२४ रोजी पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार व त्यांच्या पत्नीच्या नावे खरेदी केलेल्या सदनिकेची दस्त नोंदणी करीता तडजोडअंती १२,०००/- रूपयाची मागणी करून दस्त नोंद करून दिला व दिनांक ३१/०१/२०२४ रोजी पुन्हा कार्यालयात येण्यास सांगितले त्यानुसार दि. ३१/०१/२०२४ रोजी च्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक राज बापू कोळी यांचे सांगण्यावरून खासगी इसम नामे सुभाष ठाकरे यांनी तक्रारदार यांच्याकडून नोंदणीच्या दस्ताची प्रत देण्याकरीता रूपये १२,०००/- लाचेची रक्कम स्विकारतांना सह दुय्यम निबंधक वर्ग २ कल्याण ५, कल्याण येथील कार्यालयात रंगेहात पकडण्यात आले.

---

**मार्गदर्शन अधिकारी :- मा. श्री. सुनिल लोखंडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि., ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांच्याशी संपर्क करावा.

---


संपर्क पत्ता :- ला.प्र.वि., ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१

संकेतस्थळ :- acbmaharashtra@mahapolice.gov.in

ई - मेल :- spacbthane@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार :- acbmaharashtra.net

टोल फ्री नं. :- १०६४

दूरध्वनी क्र. :- ०२२/२०८१३५९९

व्हॉट्सअॅप नं. :- ९९३०९९७७००.


( प्रमोद जाधव )

पोलीस उप अधीक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे